# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## ई-टेंडर नोटीस क्र. पुअहोसोविसो / क्रीडा व शा. शि. /

## क्रीडा महोत्सव -२०१९ करिता भोजन व्यवस्था पुरविणेसाठी ई-निविदा

**अधिकच्या माहितीसाठी खालील पोर्टलला भेट द्या**

http:/maharashtra.etenders.in or http://su.digitaluniversity.ac

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर-४१३२५५ महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१-७३ (११ लाईन्स) फॅक्स-०२१७-२३५१३००
संकेतस्थळ :http://su.digitaluniversity.acई-मेल:fao@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)



| कामाचे नाव | अंदाजे रक्कम रूपये लाखात | बयाणा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|
| **क्रीडा महोत्सव २०१९ करिता भोजन व्यवस्था** | **रू. ७६,४४,०००/-** | **रू. १,००,०००/-** | **रू. १०,०००/-** |

ई- निविदा बाबतची सविस्तर माहिती / सुचना विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेत स्थळावर तसेच ई- निविदा सुचना अटी निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर डाऊनलोड करण्यास व निविदा भरण्यास दि. ०२/११/२०१९ पासून दि. १४/११/ २०१९ पर्यंत उपलब्ध आहे.

कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

दिनांक : ०२/११/२०१९

जा.क्र. पु.अ.हो.सोविसो/वि.व ले/के.ख.वि./ ई-निविदा / २०१९-२०/ **कुलसचिव**

# विवरण

# क्रीडा महोत्सव २०१९ करिता भोजन व्यवस्था


| अ.क्र. | विवरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | ई-निविदा सुचना | ३ |
| २ | ई-निविदा कार्यप्रणाली | ४-५ |
| ३ | परिशिष्ट अ (भोजन पदार्थ सुची) | ६ |
| ४ | ई-निविदेच्या अटी व शर्ती | ७-१० |
| ५ | वित्तीय लिफाफा | ११ |
| ६ | हमीपत्र | १२ |
| ७ | ई-निविदा वेळापत्रक | १३ |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## ई-निविदा सूचना

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर "क्रीडा महोत्सव २०१९" करिता या निवदेसोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद केलेल्या भोजन पदार्थ सूची (मेनू) तसेच अटी व शर्तीच्या अनुषंगाने भोजन व्यवस्था पुरविण्याच्या कामाबाबतची ई-निविदा (दोन लिफाफा पध्दतीने) मागविण्यात येत आहे. सदर कामाची प्रक्रिया ऑनलॉईनव्दारे करण्यात येईल. या निविदेसंबंधीत यापूढील सर्व सूचना/शुध्दीपत्रक/मुदतवाढ देणे, त्यात काही बदल हे केवळ प्रस्तुत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व महाराष्ट्र शासनाच्या ई-महाटेंडर वेबसाईटवर प्रसिध्द केले जातील. वरील निविदेबाबत संपुर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in आणि http://su.digitaluniversity.ac संकेतस्थळावर दिनांक ०२/११/२०१९ रोजी दुपारी ०४.०० वाजेपासून दिनांक १४/११/२०१९ दुपारी ४.०० वाजेपर्यंत पाहता येईल, डाऊनलोड करता येईल व निविदा भरता येईल.

संदर्भ : पुअहोसोविसो/क्रीडा व शा.शि./
स्थळ : सोलापूर
दिनांक : ०२/११/२०१९

**अध्यक्ष**
**भोजन समिती क्रीडा महोत्सव २०१९**

**प्रत माहितीस्तव :**

१) जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर ई-निविदा दै. -------------------- मध्ये प्रसिध्द करावे.
२) नोटीस बोर्ड, प्रशासकीय इमारत, प्रस्तुत विद्यापीठ

ई-निविदा प्रक्रियेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रकाशित करण्याचा दिनांक | ०२/११/२०१९ | सकाळी - ०४ :०० |
| २ | निविदा सादर करणे प्रारंभ दिनांक | ०२/११/२०१९ | सकाळी - ०४ :०० |
| ३ | निविदा सादर करणे अंतिम दिनांक | १४/११/२०१९ | दुपारी - ०४ :०० |
| ४ | निविदा उघडण्याचा दिनांक (Technical Bid opening ) | १६/११/२०१९ | दुपारी - ०३ :०० |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सुचना

अध्यक्ष, भोजन समिती, क्रीडा महोत्सव-२०१९ तथा केंद्रीय खरेदी विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (दुरध्वनी क्रमांक ०२१७-२७४४७७८) सांकेतिक स्थळ (http://su.digitaluniversity.ac) हे खालील कामाकरिता ई-टेंडरिंग पध्दतीने नोंदणीकृत व अनुभवी भोजन तयार करणाऱ्या कंत्राटदार यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे. निविदा विषयी तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरिंग पोर्टल (www.mahatenders.gov.in) च्या पोर्टलवर दिनांक ०२/११/२०१९ रोजी दुपारी ०४.०० वाजल्या पासून पहावयास मिळेल.

भोजन समिती सदस्य व सर्व निविदाकारांची पूर्व निविदा बैठक (Pre Bid Meeting) ही दि.११/११/२०१९ सकाळी ११.०० वाजता अध्यक्ष, भोजन समिती तथा केंद्रीय खरेदी समिती, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे आयोजित केली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची बयाणा रक्कम रू. | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदेची किंमत रू. |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा महोत्सव-२०१९ करिता चहा, अल्पोपहार व भोजन व्यवस्था करणे. | १,००,०००/- | २५/१२/२०१९ ते ३०/१२/२०१९ | रू. १०,०००/- |

निविदेबाबत व निविदा प्रक्रियेबाबत अधिक तपशील प्राप्त करण्यासाठी निविदाधारकांनी वर उल्लेख केलेल्या वेब पोर्टलला भेट द्यावी.

प्रस्तुत निविदा सुचना विद्यापीठाचे सांकेतीक स्थळ (website) http://su.digitaluniversity.ac वर उपलब्ध आहे.

जा.क्र.
दिनांक : ०२/११/२०१९

अध्यक्ष
भोजन समिती, क्रीडा महोत्सव-२०१९
पुअहोसोवि, सोलापूर

## ई-निविदा बाबत आवश्यक सुचना

१) सदर ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी शासनाच्या www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर स्वत:चा **युजर नेम पासवर्ड** नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. तसेच स्वत:चे डिजिटल स्वाक्षरी सर्टीफिकेट वापरणे गरजेचे आहे.

२) सदर कामाच्या आवश्यक अर्टी व शर्ती तसेच निविदा दाखल करण्याचे वेळापत्रक ई-माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

३) सदर ई- निविदा बाबत अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी केंद्रीय खरेदी विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ या कार्यालयातील भ्रमणध्वनी क्रमांक (९९२२७६६५६७, ९८९०६३९४९७, ९७६६३८१०२५) चौकशी करता येईल.

**४) सदरील कामाकरिता निविदा शुल्क रू. १०,०००/- (विना परतावा) आणि अनामत रक्कम रू. १,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख रुपये ) (परतावा) ऑनलाईनव्दारे भरणा करावी लागेल. धनादेश व धनाकर्ष याव्दारे उपरोक्त रक्कम स्विकारली जाणार नाही.**

५) निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निश्चित केलेल्या निविदाधारकास वगळून उर्वरित निविदाधारकांची अनामत रक्कम ऑनलाईनव्दारे परत करण्यात येईल.

६) लिफाफा क्र. "अ" मध्ये साक्षांकित केलेले कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

७) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतीही मुदतवाढ अथवा सवलत दिली जाणार नाही.

**८) ज्या निविदाधारकांची निविदा मंजुर होईल त्यांच्याकडून सुरक्षा ठेव म्हणून पुरवठा करावयाच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात येईल**.

९) कोणत्याही निविदा अंशत: अथवा पुर्णत: स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**क्रीडा महोत्सव-२०१९ स्पर्धेनिमित्त दि. २५.१२.२०१९ ते ३०.१२.२०१९ हया कालावधीमध्ये अंदाजे ४,५०० *व्यक्तीकरिता लागणारे भोजन पदार्थसुची (मेनु) दर्शविणारे विवरणपत्र***

| दिनांक | सकाळी अल्पोपहार | दुपारचे भोजन (पिण्याच्या पाण्यासह) | रात्रीचे भोजन(पिण्याच्या पाण्यासह) |
|---|---|---|---|
| २५/१२/२०१९ | | अगोदरच्या दिवशी रिपोर्टींग करणाऱ्या विद्यापीठ संघास चहा व अल्पोपहाराची व्यवस्था. | साधा भात, वरण, चपाती, भाकरी, दाळ पेंडपाला ( पातळ भाजी ) |
| २६/१२/२०१९ | चहा, कॉफी, दुध, बॉईल अंडी, ब्रेड, पोहे, शेव, केळी | सिताफळ रबडी किंवा रस मलाई किंवा डॉलर जिलेबी (यापैकी एक),<br>मटर पनीर मसाला, दाल तडका, साधा राईस, मसाला राईस, चपाती, मसाला पूरी, भजी किंवा पकोडा, लोणच, पापड, सॅलड | व्हेजभूना, उसळ, व्हेजपुलाव, गुजरात, कडी, साधा राईस, चपाती, पूरी, पापड |
| २७/१२/२०१९ | चहा, कॉफी, दुध, बॉईल अंडी, ऑम्लेट, उपमा, चटणी, शेव, मिसळ पाव ब्रेड, केळी, ज्युस, मिक्सड फ्रुट जाम | आलू मटर, दोडका, जिरा राईस, चपाती, पालक पूरी, कोशींबीर / चटणी, पापड, गुलब जामून | पांढरा वटाणा, एक भाजी, फोडणी वरण, राईस, चपाती, पूरी, हिरवी चटणी, पापड, शेंगा चटणी, दही<br><br>**मांसाहारी - चिकन** |
| २८/१२/२०१९ | चहा, कॉफी, दुध, बॉईल अंडी, ऑम्लेट, ब्रेड, पोहे, ढोकला, ईडली, चटणी, शेव, केळी, मिक्सड फ्रुट जाम | पालक चुका (गरगटटा), वांगी भाजी, बेसन वडी, दही मठ्ठा, चपाती, कडक भाकरी, मसाला भात, पापड, गव्हाची खीर (हुग्गी) | कोफ्ता भाजी, दाल तडका (शेवगा), राजमा, खिचडी<br>चपाती, पुरी मसाला, पापड<br>रायता, कढी<br><br>**मांसाहारी - चिकन** |
| २९/१२/२०१९ | चहा, कॉफी, दुध, बॉईल अंडी, ऑम्लेट, ब्रेड, इडली वडा, सांबर, चटणी, पाव, रव्याचा शिरा, व्हेज सँडविच, केळी, ज्युस, मिक्सड फ्रुट जाम | छोले मसाला, मिक्स व्हेज, दाल फ्राय व्हेज बिर्याणी, चपाती, मसाला पुरी, पापड, कोशींबीर, पायनापल शिरा | मटकी, दोडका मसाला<br>आमटी, मसाला राईस<br>चपाती, पूरी, भाकरी<br>शेंगाचटणी, दही<br><br>**मांसाहारी - चिकन** |
| ३०/१२/२०१९ | चहा, कॉफी, दुध, बॉईल अंडी, ऑम्लेट, ब्रेड, आलुवडा, व्हेज पाव, उपमा, चटणी, शेव, केळी, मिक्सड फ्रुट जाम | जिलेबी पायनापल, मटर पनीर मसाला पालक - आलू मिक्स भाजी, मसाला राईस, साधा राईस, चपाती, मसाला पूरी, पापड, कोशींबीर, भजी | |

# <u>निविदेच्या अटी व शर्ती</u>

१. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र. ८२/भाग-III/उद्योग-४, दि. १ डिसेंबर २०१६ मधील नियम क्रमांक ३.१.२.१ व ३.१.२.२ मध्ये नमुद केलेल्या खरेदी प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ समिती मार्फत निविदाधारकाकडुन प्राप्त झालेल्या देकारांचा वाजवीपणा निश्चित आणि स्थापित करण्यासाठी त्यांचे निविदेमध्ये नमुद केलेले दर/किंमत वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किमतीनुसार आणि व्यावसायिक पध्दतीने तपासण्यात येतील व ते विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ समितीच्या निर्णयानुसार अंतिम राहतील. म्हणुन निविदाधारकाने निविदेमध्ये दर/किंमत नमुद करतांना वरील बाबींचा अभ्यासपुर्वक विचार करुन मेनुप्रमाणे वाजवी दर नमुद करावेत.

**२. ज्या कंत्राटदाराने यापूर्वी एखाद्या शासकीय/निमशासकीय संस्थेच्या ३,००० किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या भोजन व्यवस्थेचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले आहेत किंवा अशा प्रकारच्या स्पर्धेच्या अनुभव असल्यास अशा कंत्राटदाराने काम केलेल्या संबंधित संस्थेचे प्रशस्तीपत्र निविदेसोबत जोडणे बंधनकारक आहे.**

३. सदरील निविदेसाठी अनामत रक्कम रूपये **१,००,०००/- (एक लाख रुपये फक्त)** चा ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टलमध्ये नमूद केल्याप्रमाणे भरणा करावा लागेल.

४. यशस्वी निविदाधारकास वित्त व लेखाअधिकारी, पुअहोसोविसो हयांचे नावे सुरक्षा ठेव म्हणुन पुरवठा करावयाच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात येईल.

५. **खाद्यपदार्थ गुणवत्ता तपासणी समितीने निश्चित केलेल्या धान्य व किराणा सामुग्रीचा आवश्यक साठा कार्यक्रमाच्या तीन दिवस अगोदर म्हणजेच दि. २२/१२/२०१९ रोजी कार्यक्रमस्थळी आणून, त्याची विद्यापीठ नियुक्त तज्ञ समिती मार्फत गुणवत्ता तपासणी व योग्य प्रमाणात धान्य व किराणासाठा असल्याची खातरजमा करून घेणे बंधनकारक राहील. सदरील समितीस गुणवत्ते बाबत व आवश्यक धान्य व किराणासाठया बाबत साशंकता आढळल्यास सदरील कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार भोजन समितीने राखुन ठेवले आहेत.**

६. अतिथी, खेळाडू, पंच यांना पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थाच्या गुणवत्तेबाबत विद्यापीठाच्या खाद्य पदार्थ गुणवत्ता तपासणी समितीस तक्रार केल्यास तात्काळ त्याबाबत समिती मार्फत तपासणी

करून सदर भोजन निकृष्ट असल्याचे आढळल्यास, संबंधीत कंत्राटदाराची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.

७. कंत्राटदारास सर्व खाद्य व पेय पदार्थ उत्कृष्ट, आरोग्य वर्धक व चांगल्या मालापासुन निर्मित करणे अनिवार्य आहे. तसेच भोजन निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणार साहित्य (भांडी) स्वच्छ व मुबलक प्रमाणात असणे आवश्यक आहे. ( पुरवठाधारकास शासनाने सूचित केलेले नियमबाह्य प्लॅस्टीक वस्तू वापरता येणार नाहीत.)

८. सदर खाद्य व पेय पदार्थाचे सेवन केल्याने आरोग्यास कुठलाही धोका अथवा हानी पोहोचल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

९. भोजन व्यवस्थेतील सर्व पदार्थ अमर्यादीत स्वरूपात पुरवावे लागतील.

१०. भोजनासाठी गोड पदार्थ हे वनस्पती तुपामध्ये (सनफ्लावर ब्रँड) व इतर पदार्थ हे भुईमुगाच्या डबल फिल्टर (धारा/स्वस्तीक ब्रँड) खाद्य तेलामध्ये तयार करावे लागतील. भात तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा तांदुळ हा इंडिया गेट/ कोहीनुर/बासमती तांदुळ वापरणे अनिवार्य आहे. तसेच भोजन तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे इतर सर्व साहित्य हे नामांकित कंपनीचे Agmark प्रमाणित सीलबंद व उच्च प्रतिचे वापरणे बंधनकारक आहे.

११. खाद्य पदार्थ वाढण्यासाठी व सुरळीत अन्नपुरवठा वाटप करण्याकरिता स्वच्छ गणवेश (हात मोजे घातलेले, डोक्यावर टोपी असलेली) मितभाषी व चांगली वेशभुषा असलेले अंदाजे १००-१२० सेवक असणे आवश्यक आहे.

१२. चहा, अल्पोपहार व भोजनासाठी मुले, मुली व अधिकारी यांच्यासाठी वेग-वेगळया तीन ठिकाणी आदेशीत केल्याप्रमाणे व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

**१३. दि. २५/१२/२०१९ व ३०/१२/२०१९ रोजी १०० अतिमहत्वाच्या सन्माननिय अतिथींच्या भोजनाची वेगळी व्यवस्था करावी लागेल.**

१४. भोजन व्यवस्थेसाठी लागणारे बुफे टेबल, त्यावरील स्वच्छ कापड, टेबल सजावट, तसेच त्या सोबतच्या खुर्च्या उपलब्ध करुन देणे इत्यादी कामे कंत्राटदारास करावी लागतील.

१५. कामगार कायद्याप्रमाणे सर्व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

१६. सेवा पुरविणाऱ्या सेवकामध्ये बालमजुरांचा समावेश असु नये.

१७. महिला कामगारांना रात्रीचे भोजन तयार करण्याचे काम देण्यात येऊ नये.

१८. कंत्राटदाराने खाद्य व पेय पदार्थ निर्मितीकरीता आवश्यक असणारे सिलेंडर व तत्सम ज्वालाग्राही साहित्याची योग्य निगा ठेवावी. कोणत्याही विस्फोटक पदार्थाची हाताळणी व उपयोग करतांना कुठलीही दुखापत खेळाडु, कर्मचारी इत्यादींना झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर

राहील. कंत्राटदारांनी भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी पुर्णक्षमतेची अग्नीक्षमन व्यवस्था करणे आवश्यक आहे.

१९. कंत्राटदारास प्रत्येक खेळाडु अथवा व्यवस्थापकास विद्यापीठाद्वारे पुरविण्यात आलेल्या कुपनाच्या आधारेच खाद्य व पेय पदार्थ पुरवावे लागतील, अंतिमरीत्या एकुण प्राप्त कुपनाच्या आधारावर देयकाची अदायगी केल्या जाईल.

२०. कंत्राटदाराद्वारे वापरल्या जाणाऱ्या दुधाचा दर्जा दररोज विद्यापीठ अधिकाऱ्यामार्फत लॅक्टोमीटरद्वारे तपासण्यात येईल.

२१. खाद्य पदार्थ निर्मिती करीता बिसलरी/किंनले ब्रँडचे/मिनलर वॉटर चा वापर करावा तसेच अल्पोपहाराच्या व भोजनाच्या वेळेस सर्व खेळाडु, पंच व अधिकारी यांना बिसलरी/किंनले ब्रँडचे मिनलर वॉटर पुरविणे बंधनकारक राहील. पिण्याच्या पाण्याकरिता कागदी ग्लास चा पुरवठा करण्यात यावा.)

२२. विहीत वेळेत सर्व खेळाडू, अधिकारी वर्गास रूचकर, गरम चहा/कॉफी/दुध, अल्पोपहार व भोजन पुरविणे अनिवार्य आहे.

२३. विद्यार्थी हे खेळाडू असल्याने सर्व खाद्य पदार्थ प्रमाणबध्द तिखटामध्ये निर्मीती करणे आवश्यक आहे.

२४. भाजी, अंडी, दुध, दही, ब्रेड, उसळ व पनीर आदी साहित्य ताज्या स्वरूपाचे वापरणे अनिवार्य आहे.

२५. दिनांक २५/१२/२०१९ ते ३०/१२/२०१९ पर्यंत खाद्यपान सेवा सर्व भांडी, इतर साहित्य तसेच स्वयंपाक करण्याचा व वाढण्याचा जागा स्वच्छ ठेवावी लागेल व संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच महोत्सवादरम्यान जेवणानंतर शिल्लक राहणाऱ्या अन्नाची वेळेतच विल्हेवाट लावण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची असेल.

१) इच्छुक कंत्राटदारांनी निविदा भरण्यापुर्वी प्रत्यक्ष कार्यस्थळाची पाहणी व कामाचे स्वरूप समजावुन घेणे अपेक्षित आहे. कंत्राटदारानी यापूर्वी ३,००० किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या भोजनाच्या कार्यक्रम यशस्वीरित्या केल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र (शासकीय/निमशासकीय कार्यालयाचे).

२६. शासन निर्णय दि. १/१२/२०१६ मधील नियम ३.१.२.४ मध्ये नमुद केलेले सर्व कर कंत्राटदारास भरावे लागतील.

२७. निविदा स्विकारणे/उघडणे बाबतच्या तारखा मधील बदलाबाबत विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील.

२८. सदरील निविदे संबंधीत काही वाद निर्माण झाल्यास ते सोलापूर न्यायालय अंतर्गत राहुनच सोडविण्यात येतील.

२९. कोणतीही निविदा मंजुर करणे अथवा सर्व निविदा ना-मंजुर करुन पुर्ननिविदा करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

३०. निविदाधारकांनी त्यांच्या ई-निविदा खालीलप्रमाणे सादर करणे बंधनकारक राहील.

३१. ज्या निविदाधारकास निविदा मिळेल त्या निविदाधाकराकडून रू.५००/- स्मँप पेपरवर सदर कामाचा करारनामा करून घेण्यात येईल.

**अ) लिफाफा क्रमांक "अ" तांत्रिक लिफाफा.**

यामध्ये ई-निविदाधारकास महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल मध्ये निविदा धारकास खालील प्रमाणे दोन सीलबंद लिफाफयामध्ये निविदा सादर करावी लागेल. **लिफाफा "अ" (तांत्रिक लिफाफा) वर <u>चहा, अल्पोपहार, भोजन व व्यवस्थेची निविदा असे स्पष्टपणे नमुद</u> आणि लिफाफा "ब" (वित्तीय लिफाफा) वर <u>चहा, अल्पोपहार, भोजन व व्यवस्थेची निविदा असे स्पष्टपणे नमुद</u>** असे स्पष्ट नमुद केलेले असावे.

**तांत्रिक लिफाफा "अ"** मध्ये खालील कागदपत्राच्यां सत्यप्रती असणे आवश्यक आहे.

२) इसारा रूपये १,००,०००/- रक्कम ऑनलाईनद्वारे भरलेली पावती.

३) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत वैध कालावधी असलेले नोंदणी प्रमाणपत्र.

४) आयकर पॅनकार्ड प्रमाणपत्र.

५) अन्न व औषधी विभाग महाराष्ट्र शासन यांचे खाद्यविक्रेते प्रमाणपत्र.

६) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र.

७) GST नोंदणी प्रमाणपत्र.

८) शासकीय/निमशासकीय संस्थेसाठी काम केल्याचे प्रमाणपत्र.

९) ३,००० किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या भोजनाच्या कार्यक्रम यशस्वीरित्या केल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र (शासकीय/निमशासकीय कार्यालयाचे).

१०) अटी व शर्ती मान्य असल्याचे हमी पत्र

तांत्रिक लिफाफा "अ" मधील सर्व कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतरच लिफाफा "ब" उघडण्यात येईल.

# क्रीडा महोत्सव २०१९

## परिशिष्ट-अ

### चहा, नाष्टा/भोजन  दरपत्रक

**(दिनांक २५ डिसेंबर  ते ३० डिसेंबर २०१९ या सहा दिवसाच्या कालावधीसाठी)**

| अ.क्र. | प्रकार | एकत्रीत दर (रूपये) प्रति दिवस प्रति व्यक्ती |
|---|---|---|
| १ | चहा / कॉफी मेनुप्रमाणे | |
| २ | अल्पोपहार/दूध मेनुप्रमाणे | |
| ३ | शाकाहारी भोजन (दोन वेळेचे) मेनुप्रमाणे | |
| ४ | मासांहारी भोजन (एक वेळेचे) मेनुप्रमाणे | |

निविदा धारकाचे नांव :

स्वाक्षरी व शिक्का

# <u>हमीपत्र</u>

**मी / आम्ही निविदा प्रपत्रातील अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या मला / आम्हाला मान्य आहेत. विद्यापीठाच्या सर्व निर्देशांचे मी / आम्ही तंतोतंत पालन करीन/करू.**

निविदा धारकाचे नांव :
स्वाक्षरी व शिक्का

नाव व संपूर्ण पत्ता :
---------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------
दुरध्वनी क्रमांक :
मोबाईल क्रमांक :

# ई-निविदा वेळापत्रक

**TENDER SCHEDULE ( Key Dates)**

| अ. क्र. | तपशील | महत्वाच्या तारखा |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रसिध्दी दिनांक<br>Release of Tender | 02.11.2019 |
| 2 | ई-निविदा डाऊनलोडींग दिनांक<br>Technical document downloading | 02.11.2019 |
| 3 | ई-निविदा ऑनलाईन सादर करण्याची अंतिम तारीख<br>Last date of Online Submission | 14.11.2019 |
| 4 | निविदाधारका सोबत पुर्व तांत्रिक बैठक<br>Pre-Technical Bid meeting | 11.11.2019 |
| 5 | तांत्रिक लिफाफा क्र. १<br>Technical Bid Opening | 16.11.2019 |
| 6 | वित्तीय लिफाफा क्र. २ उघडण्याचा दिनांक<br>Short listing and Financial Bid opening | 18.11.2019 |